● रविवार, दि १५ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ५६ वा ● किंमत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## श्री क्षेत्र ओंकारेश्वर येथे सभागृह बांधणार

### माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांचे आश्वासन

**मंठा । प्रतिनिधी -** वारकरी संप्रदाय हा वारकरी पंथाला आपले संपूर्ण जीवन अर्पण करणारा; राज्याला, देशाला समाज प्रबोधनाची दिशा देणारा, चुकले माकल्यांना सन्मार्गाची दिशा देणारा असून समाज घडविण्याचे काम वारकरी संप्रदाय करत असतो.

महाराष्ट्र ही संतांची भूमी असून मोठी संत परंपरा आपल्याला लाभली. संत परंपरा, वारकरी पंथ हे महाराष्ट्राचे वैभव आहे. राजकीय अधिष्ठानापेक्षा वारकरी पंथाचे अध्यात्मिक आणि धार्मिक अधिष्ठान मोठे आहे. कारण धकाधकीच्या आयुष्यात पांडुरंगाचे नामस्म रण करताना चांगले विचार, चांगले कार्य करण्याचे विचार मनात येतात, दुष्ट विचार दूर जातात. मला काय मिळाले यापेक्षा दुसऱ्याला काय देणार हे महत्त्वाचे आहे. स्वत:साठी जगत असताना



दुसऱ्याचे दुःख वाटून घेण्याचे काम करणाऱ्यांपैकी वारकरी संप्रदाय आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री पदापूर विधानसभा म तदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. ते श्री क्षेत्र ओंकारेश्वर संन्यास आश्रम पंचायती आनंद आखाडा देवगाव खवणे तालुका मंठा जिल्हा जालना येथे वार्षिक गणेश महोत्सव निमित्त अकरा गाव एक गणपती व अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यातील ह. भ. प. समाधान महाराज शर्मा केज यांच्या आयोजित हरी कीर्तनाला उपस्थित भाविक भक्तांशी संवाद साधताना बोलत होते.

पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की श्री क्षेत्र ओंकारेश्वर येथे बारागाव एक गणपती हा उपक्रम महाराष्ट्रातील सर्व गणेश मंडळांना प्रेरणादायी ठरणार आहे. याच अनुषंगाने श्री क्षेत्र ओंकारेश्वर येथे एक कोटी रुपये किंमत असलेल सभागृह येत्या पुढील वर्षात आपण पूर्ण करणार असून त्याकरता विशेष निधीची तरतूद ही आपण करणार आहोत. या प्रसंगी मताधिपती गुरुवर्य परमश्रद्धेय श्री महंत भागवतगिरीजी महाराज श्री महंत बालकगिरीजी महाराज बाळासाहेब जाधव गणेशराव खवने राजेश मोरे नाथाराव काकडे विलास घोडके म ाऊली शेजूळ जिजाबाई जाधव विकास पालवे उदय बोराडे मनोज देशमुख यांच्या सह परिसरातील बारा ही गावातील हजारो महिला व पुरुषांची उपस्थिती होती.

## मराठा सेवक निवडीसाठी शेवगा येथे तालुक्यातील पहिली बैठक



**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील शेवगा येथे सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा सेवक निवडीची तालुक्यातील पहिली बैठक पार पडली. या बैठकीत मराठा सेवकांची निवड करण्यात आली आहे.

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे सूचनेवरून प्रत्येक गावातून चोवीस मराठा सेवकांची निवड करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने मराठा सेवक नामदेव धुमाळ,अजय मिठे, श्रीरगं धुमाळ यांनी बैठकीत मार्गदर्शन केले. यावेळी मोठ्या संख्येने मराठा बांधव या बैठकीत उपस्थित होते. या बैठकीत या मराठा सेवकांनी सतत सक्रिय राहून जरांगे पाटलाच्या ज्या काही सूचना येतील त्याप्रमाणे काम करायचे आहे. गावातील मराठा सम ाजाला अडचणीच्या वेळी मदत करणे. काही नैसर्गिक आपत्ती असेल,रक्तदान असेल किंवा समाज उपयोगी उपक्रम असेल त्यामध्ये हिरीरीने सहभागी होणे. गावातील पान २ वर

## ‘मुख्यमंत्री योजनादूत’; अर्ज करण्यास मुदवाढ

**मुंबई -** शासनाच्या विविध योजनांची सर्वसाम ान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असून आता १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी ु.ारहरेूक्षरपर्वी.ीस या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येम ागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा पान २ वर

## ग्रामीण विकासासाठी मूलभूत सुविधा योजनेअंतर्गत ०५ कोटी निधी मंजूर

### माजी मंत्री खोतकर यांचा विकास कामाचा धडाका सुरूच...

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांचा विकास कामाचा धडाका सुरूच असून त्यांनी ग्रामीण भागासाठी स.न.२०२४-२५ या आर्थिक वर्ष तरतुदीनुसार मूलभूत सुविधा योजनेअंतर्गत (२५ १५, १२३८ ) या योजने अंतर्गत जवळपास ०३ कोटी रुपयाचा निधी ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या शासन निर्णय क्रं. विकास २०२४ /प्र.क्र.२१४/ योजना ६, दिनांक १३ सप्टेंबर २०२४ नुसार व मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत इमारत बांधणी योजने अंतर्गतखालील गावांना ग्राम पंचायत इमारत बांधकामना मंजुरी मि ळाली॰ यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतला बांधकामासाठी २० लक्ष प्रमाणे ०१कोटी ७०लक्ष रुपयांचा निधी मिळणार आहे. यामध्ये प्रामुख्याने मौजपुरी, बोरखेडी, इंदलकरवाडी, गवळीपोखरी, पाहेगाव, धावेडी, खरपुडी, कुंबेफळ सिदखेड, या ग्रामपंचायत चा समावेश आहे ही कामे जि. प. बांधकाम विभागा मार्फत होणार आहे.व उर्वरीत निधी अंतर्गत ग्रामीण भागामध्ये विविध ठिकाणी सा.सभागृहाचे कामे मंजूर करण्यात आली असून ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत त्वरित हाती घेण्यात येतील व दर्जे दार केले जाणार आहेत , असे शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाम ध्ये म्हटलेले आहे. गेल्या दोन महिन्यांम ध्ये अर्जुनराव खोतकर यांनी जालना विधानसभा मतदारसंघांमध्ये विकास काम ाचा झपाटा लावलेला असून कोट्यावधी रुपयांची विकासकामासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून घेतलेला आहे .यामध्ये प्रामुख्याने , जिल्हा नियोजन समिती, नगर विकास विभाग ,ग्रामविकास विभाग, अल्पसंख्याक विभाग, रोहयो विभाग , सामाजिक न्याय विभाग आदी विभागातील काम ाचा समावेश आहे. जालना विधानसभा म तदारसंघासाठी



भरपूर निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, अजित पवार, ग्रामविकास मंत्री गिरीश म हाजन, अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार, रोहयो मंत्री दादा भुसे, पालकमंत्री अतुल सावे यांचे आभार व्यक्त केले.

## राज्यस्तरीय ज्युनीयर टेनीस बॉल क्रिकेट स्पर्धेकरीता निवड चाचणीचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** टेनीस बॉल क्रिकेट असोसिएशन ऑफ महाराष्ट्र व नंदुरबार जिल्हा टेनीस बॉल क्रिकेट असोसीएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८ ते ३० सप्टेंबर २०२४ दरम्यान नंदुरबार येथे होणार्या ज्युनीयर १९ वर्षाआतील मुले व मुली च्यां राज्यस्तरीय टेनीस बॉल क्रिकेट स्पर्धे साठी जालना जिल्हा टेनीस बॉल क्रिकेट असोसीएशनच्या वतीने दिनांक १९ सप्टेंबर २०२४ गुरूवार रोजी जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे सकाळी ११ वाजल्यापासुन निवड चाचणीचे आयोजन करण्यात आलेले आहे. निवड चाचणीमधुन जालना शहर व जालना ग्रामीण असे दोन संघ प्रत्येकी १४ मुले व १४ मुलींची निवड करण्यात येणार आहे.

निवड चाचणीमध्ये सहभागी होण्याकरीता कोणतेही नोंदणी शुल्क आकारण्यात येणार नसुन खेळाडुचे १९ वर्षाच्या आत व जन्मतारीख ३०/०९/२००३ च्या नंतरची असणे आवश्यक आहे. अधिक माहीतीसाठी जिल्हा संघटनेचे सचिव शेख चाँद पी.जे. मो.नं.९८२२४५६३६६ किंवा जयकुमार वाहुळे, नितीन जाधव, संतोष वाघ, शेख समीर, सोहेल खान, यांच्याशी संपर्क साधावा.

तरी निवड चाचणीमध्ये जास्तीत जास्त खेळाडुंनी सहभागी व्हावे असे आवाहन जालना जिल्हा टेनीस बॉल क्रिकेट असोसिएशन, जिल्हा ऑलंम्पीक असोसिएशन जालना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## सोयाबीन पडतेय पिवळे

**भोकरदन । प्रतिनिधी -** नळणी तडेगावसह परिसरात सोयाबीन चे पीक फुलोरा अवस्थेत आहेत परंतु वातावरणातील बदललामुळे सोयाबीन पीकावर रोगराईचा प्रादुर्भाव अधिक दिसून येत आहेत अळी व बुरशी मुळे सोयाबीन पीकाची नुकसान होण्याची शक्यता जास्त प्रमाणात आहे .शिवाय सोयाबीन पीकाची पाने पिवळी होत आहेत. शिवाय कपाशी पीकावर सुद्धा मावा व पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव दिसून आला आहे.अळीचे प्रमाण अधिक आहेत. त्यामुळे महागडी कीटकनाशके फवारणी करावी लागत आहेत त्यामुळे उत्पादन खर्चात वाढ होत आहे.दरम्यान पाउसाने उघडीप दिल्याने शेतकरी अंतरमशागतीच्या कामत व्यस्त असल्याचे दिसत आहेत.

युवा आदर्श

### हिट रन ...

हिट आणि रन चे
वाढत चाले प्रकार
सोडून पळे वाहने
ड्रायव्हर बेदरकार
अपघातग्रस्त त्रस्त
वेदनेत होई बेजार
संवेदना बने बोथट
बळावे नव आजार
जनता होते संतप्त
माते मनी दुराचार
चोप देतात चालका
घे खरपूस समाचार
उद्रेक माजे रस्त्यात
अंगात राक्षस संचार
अपघातग्रस्ता वरती
कधी कराल उपचार
मदत याचना करत
सोबतचे हो लाचार
कुणाचे चूक बरोबर
कधी करालं विचार
कडक कायदा हवा
प्रतिबंधीत दुराचार
प्रबोधन हवे अपार
सोबत हा द्विविचार

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## परतूर, सेलू येथे जनशताब्दी एक्स्प्रेस रेल्वेचा थांबा वाढला



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर व सेलू येथ जनशताब्दी एक्स्प्रेस या रेल्वेचा थांबा वाढवून मिळाला, डॉ स्वप्नील मंत्री यांच्या सातत्यपुर्ण पाठपुराव्याची दखल घेत परतूर व सेलू येथील जनशताब्दी एक्स्प्रेस ह्या सुपरफास्ट एक्स्प्रेसचा थांबा वाढवून मिळावा यासाठी डॉ. स्वप्नील बी. मंत्री अध्यक्ष परतूर रेल्वे संघर्ष समिती यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे राज्यमंत्री वी. सोमण्णा, डीआरएम नांदेड निती सरकार यांनी गेल्या दोन महिन्यांपासून सतत पाठपुरावा चालू ठेवला होता त्याची दखल घेत ह्या गाडीचा परतूर व सेलू येथील थांबा वाढवून देण्यात आला आहे. ह्याबद्दल डॉ. स्वप्नील बी. मंत्री, डॉ. सुधीर आंबेकर, अजित पोरवाल, सखाराम कुलकर्णी, डॉ. हरिप्रसाद ढेरे, डॉ उद्धव चव्हाण, उमेश देशपांडे, विठू कुलकर्णी, सावता काळे, अर्जून जगताप, म हेंद्र कोटेचा, आनंद बगडीया, योगेश खंडेलवाल, प्रवीण कावले, सौरभ बगडीया, निहित सकलेचा, रवी मुंदडा, अमित मोर, प्रशांत डोम, रवी दायमा, अभिजीत जोशी, आनंद कोटेचा, कल्पेश भंडारी, अशोक शेळके, पवन अग्रवाल, स्वप्नील भंडारी व परतूर सर्वांगिण विकास समितीच्या सर्व सदस्यांनी पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री श्री अश्विनी वैष्णव, रेल्वेराज्यमंत्री श्री वी. सोमण्णा, अरुण जैन जनरल मॅनेजर सिकंदराबाद, नीती सरकार डीआरएम नांदेड यांचे परतूर रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने विशेष आभार व धन्यवाद व्यक्त केले.



# संपादकीय

## २५ वर्षानंतर सुंदर नाते मैत्रीचे

आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली. पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले. १९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले. विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# पारंपारीक खेळाच्या माध्यमातून दर्जेदार खेळाडू निर्माण होतील - आ. गोरंट्याल



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील श्री गणेश महासंघाने पारंपरिक खेळाच्या स्पर्धा आयोजित करण्याचे प्रशंसनीय कार्य केले आहे, याच पारंपारिक खेळाच्या माध्यमातून जालन्यातून दर्जेदार खेळाडू निर्माण होतील, असे प्रतिपादन आमदार कैलास गोरंट्याल यांनी आज ( दि. १३) येथे केले.

श्री गणेश महासंघातर्फे चंद्रशेखर आझाद मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी नगराध्यक्ष भास्कर अंबेकर, माजी उपनगराध्यक्ष भास्कर दानवे, मनसेचे जिल्हा प्रमुख रवींद्र राऊत, ज्येष्ठ सामाजिक नेते ड. ब्रह्मानंद चव्हाण, रामेश्वर भांदरगे, अर्जुन गेही, सिध्दीविनायक मुळे, विश्वनाथ क्षीरसागर, संजय आठवले, महेंद्र रत्नपारखी आदींची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना आमदार गोरंट्याल पुढे म्हणाले की, जालना शहरातील अनेक खेळाडूंनी कुस्ती, कबड्डी, क्रिकेट आदी खेळाच्या माध्यमातून जालना शहराचे नाव रोशन केले आहे. आज आधुनिक खेळ प्रकार वाढीस लागले असून पारंपरिक खेळ मागे पडत चालले आहेत, नवीन पिढीला आपल्या पारंपरिक खेळाची ओळख व्हावी, त्यांच्यात पारंपरिक खेळाविषयी आवड निर्माण होण्याची गरज आहे. श्री गणेश महासंघातर्फे गणेशोत्सवानिमित्ताने पारंपरिक खेळाच्या स्पर्धा आयोजित करून जालना जिल्ह्यातील क्रीडा चळवळ गतिमान करण्यासाठी पुढाकार घेऊन प्रशंसनीय कार्य केले आहे. पारंपरिक खेळाच्या आयोजनामुळे जालन्यातून दर्जेदार खेळाडू निर्माण होतील, असेही ते म्हणाले.

यावेळी बोलताना भास्कर अंबेकर यांनी श्री गणेश महासंघातर्फे आयोजित विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून जालना जिल्ह्यातील खेळाडूंना प्रोत्साहन दिले असल्याचे सांगितले. भास्कर दानवे यांनी यावेळी बोलतांना श्री गणेश महासंघातर्फे आयोजित विविध उपक्रमाचे कौतुक करून गणेश महासंघातर्फे यापुढेही असेच सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रास्ताविक करतांना श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर यांनी श्री गणेश महासंघातर्फे प्रथमच विविध उपक्रम व क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गणेश महासंघाचे कार्याध्यक्ष ड. महेश धन्नावत यांनी केले. यावेळी गणेश महासंघाचे उपाध्यक्ष डॉ. विजय विजय सेनानी, अर्जुन पित्ती,शिवराज जाधव, क्रीडा प्रशिक्षक प्रमोद खरात, रवींद्र ढगे, प्रशांत नवगिरे, राजू थोरात यांच्यासह श्री गणेश महासंघाचे पदाधिकारी, खेळाडू,क्रीडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कबड्डी स्पर्धेत तळेगाव पिंपरी, पैठण, बारमती, नंदापूर,लक्ष्मीनगर, संभाजीनगर, हस्तूर, धामणगाव, आळंद, निकळक अकोला, खरपुडी, जाफ्राबाद, शिंदी, गंगाखेड, निफाड,नाशिक, मानवत, जालना, अकोला, नेवासा येथील मुले- मुलींचे असे ३६ संघ सहभागी झाले आहेत. या कबड्डी स्पर्धेतील सर्व सामने रंगतदार झाले. रात्री उशिरापर्यंत ही कबड्डी स्पर्धा चालली.

# बंजारा शेतकरी मेळावा संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** कृषि उत्पन्न बाजार समिती, जालनाचे बाजार आवारातील गुळ मार्केट शेजारील गोडावुन मध्ये बंजारा समाजाचा भव्य बंजारा शेतकरी मेळावा मा.श्री. अर्जुनराव खोतकर माजी राज्यमंत्री तथा मुख्य प्रशासक कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाला.

यावेळी अर्जुनराव खोतकर यांचा सपत्नीक सत्कार करण्यांत आला. प्रसंगी अर्जुनराव खोतकर यांनी भाषण पर बंजारा समाज हा कष्टकरी समाज असुन बंजारा समाज हा खुप मोठा समाज असुन मागील काही काळा पासुन या समाजाने खुप मोठ्या प्रमाणावर प्रगती केलेली आहे. आज ब-याच मोठ्या पदावर व उद्योग/व्यापार क्षेत्रात नामवंत नावे हे बंजारा समाजाच्या बांधवाचे आहे. बंजारा समाजाला यापुढे आवश्यक असणा-या सुविधा पुरविणे बाबत माझ्या कडुन तसेच बाजार समितीकडुन जास्तीत जास्त देता येईल तेवढया सुविधा देण्याचा व त्यांच्या मागण्या पुर्ण करण्याचा प्रयत्न मी करेल. पोहरादेवी येथे मुख्यमंत्री यांनी ७०० कोटी रुपये विकास कामासाठी मंजुर करण्यात आलेले असुन नंगारा भवनाचे काम हे पुर्णत्वाला आले असुन लवकरच त्याचे लोकार्पण करण्यांत येईल व मी खंबीर पणे बंजारा समाजाच्या पाठीशी आहे असे आपल्या भाषणातुन त्यांनी आपले व्यक्तव्य व्यक्त केले.

यावेळी बंजारा समाजाचे उध्दव पवार, प्रकाश चव्हाण, परसरराम राठोड, जयकुमार राठोड, अंकुश राठोड, शेषराव पवार, गुलाब चव्हाण, मुरलीधर चव्हाण, शेषराव चव्हाण, रंगनाथ आढे, वामन आढे, डॉ. ओंकार राठोड, डॉ.बी. बी. चव्हाण, डॉ. विजय राठोड, प्रा. रमेश राठोड, प्रा.दत्तु चव्हाण, मुरलीधर जाधव, मोहनजी राठोड निवृत्त सब रजिष्टार, धन्नु गायके सरपंच पाथुड, छगन किटाळे, गोरख पवार तसेच बंजारा समाजाचे मोंढ्यातील आडते, खरेदीदार सिताराम पवार, संजय राठोड, राजु राठोड, गजानन पवार, अनिल चव्हाण, गजानन आढे यांच्या सह समाजातील समज बांधवाची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती सदर कार्यक्रमाचे आयोजन हे मयुरेश्वर ट्रेडींग कंपनीचे भागीदार बाळु शिंदे यांनी केले.



रेशीम अधिकारी मोहितें साहेब यांनी रेशीम शेती बाबत सविस्तर माहिती शेतकरी मेळ्यातील उपस्थित शेतक-यांना दिली. यावेळी बाजार समितीचे संचालक संतोष मोहिते, माजी संचालक अनिल सोनी, रमेश तोतला व्यापारी हुकुमचंद पाटणी, निवृत्ती पाचफुले, विरेंन्द्र रुणवाल, रामेश्वर बोडखे, गोविंद सराटे, प्रदीप गवारे, सुनिल गोयल, अशोक पाचफुले तसेच बाजार समितीचे सचिव श्री. मोहन राठोड, सहा. सचिव अनिल खंडाळे, भगवान शिंदे, भरत तनपुरे, लेखापाल अजय मिरकड, अशोक कोल्हे, निरिक्षक शिवानंद पालवे, प्रसाद काकडे, संजय जाधव, प्रफुल हिवरेकर, कैलास चव्हाण, रोहिदास बिल्लोरे यांच्या सह व्यापारी, आडते, हमाल, मापाडी, शेतकरी यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# श्री रामनगराचा राजा गणपती मंडळाकडून शिबिर; ३० दात्यांचे रक्तदान



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील सीयाराम प्रतिष्ठान सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ, श्रीराम नगरचा राजा गणपती यांच्या कडून भव्य रक्तदान शिबिर पार पडले तीस तरुणांनी रक्तदान करून एक चांगला संदेश सर्वांसाठी दिला.या वेळी पो निरीक्षक सचिन खामगळ रामप्रसाद बारगुडे अलकेश सोमानी अमोल जमधडे सतीश खांडेभराड ऋषिकेश पाचे संतोष मैंद लखन पाची अनिकेत अंभोरे निलेश दहिकर अभिजीत देशमुख भालचंद्र मुळे गोपाल काठोळे वैभव कुलकर्णी पवन पाचे शंकर सपकाळ अभिषेक तांबेकर पवन घोडके सागर तांबेकर अजय खांडेभराड आशिष बारगुडे मुकेश शर्मा विलास जाधव गणेश कुमकर जनार्दन राऊत यश शर्मा महेश इंगळे अभिजीत बारगुडे वैभव मुळे या तीस रक्तदाते यांनी रक्तदान केले. या मंडळाच्या वतीने रोज रात्री विद्यार्थी यांच्या साठी वेगवेगळ्या स्पर्धा ठेवण्यात आलेले आहे. रोज रात्री आरती झाल्या नंतर हरिपाठ हरिनाम कीर्तन होते आहे.हा सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे सर्व सदस्य परिश्रम घेत आहे.अध्यक्ष अजय खांडेभराड उपाध्यक्ष अभिषेक तांबेकर सचिव सागर तांबेकर कोषाध्यक्ष शुभम मुळे सदस्य विनायक ढवळे अभीजीत बारगुडे जनार्दन राऊत पवन घोडके वैभव मुळे यश शर्मा अनिकेत अंभोरे शैलेश देशमुख वैभव कुलकर्णी प्रणव डोमळे योगेश घोडके चैतन्य घोडके आनंद वाघ गोपाल पेटुळे निलेश दहिकर आशिष बारगुडे गणेश कल्याणकर धीरज खांडेभराड चैतन्य राऊत मयूर टेकाळे ओम गायमुखे शंकर घोडके विनायक मुळे अभी डोमळे रोहित पाटेकर ओम राऊत तुषार बारगुडे युवराज खजाने गौरव कुलकर्णी. या मंडळाच्या वतीने आज गौरी आश्रमाचे प्रमुख महेश गिरी महाराज यांचे कीर्तन असून या कीर्तनाचा लाभ घेणे असे मंडळ यांनी सांगीतले. या शिबिर साठी जालना येथून जनकल्याण रक्तपेढीचे सदस्य आले होते.

रक्तदान हे सर्व दानांपैकी सर्वश्रेष्ठ दान असून रक्तदान बाबत असलेले गैरसमज मनातून काढून सर्वांनी रक्तदान करावे. रक्तदान केल्याने रक्त कमी होत नसून तुमची प्रतिकार शक्ती वाढते. रक्तदान ही देशाची सर्वात मोठी गरज असल्याचे टेंभुर्णीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांनी यावेळी म्हटले.

# गणपती आणि अध्यात्म!

गणपतीला दुर्वा फार आवडतात. लोकांच्या दृष्टीने ज्याला काही महत्त्व नाही, असे गवत त्याने आपले मानले व त्याचे मूल्य वाढविले. नेता आणि तत्त्ववेत्ता ज्यांना काही महत्त्व नाही, ज्यांना कोणी विचारत नाही, अशांना आश्रय देतात. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करुन जीवंत जीवन जगण्याची प्रेरणा देतात. दुसरे, दूर्वांना काही रंग नाही, सुगंध नाही. रंगविरहीत, सुगंधविरहीत; ज्याची जगाच्या दृष्टिने काही किंमत नाही असे कर्मदेखिल प्रभुचरणावर प्रेमाने वाहिले तरी त्याला आवडते.

गणपती बाप्पाला लाल रंगाचे फूल अधिक प्रिय आहे. लाल रंग हा क्रांतीचा सूचक आहे. शिवाय गणरायाला आपण तांदूळ वाहतो. तांदुळाला संस्कृतमध्ये 'अक्षता' म्हणतात. अक्षत म्हणजे जो तुटलेला नाही असा; जो खंडीत नाही तर अखंड आहे. देवाबद्दलच्या आपल्या अखंड भक्तीचे दर्शन अक्षता वाहण्यात आहे. गणपतीला 'वक्रतुंड' म्हणतात. ऋध्दिसिध्दीपासून मुख फिरवून राहणाऱ्यालाच ऋध्दिसिध्दी मिळतात. वाकडे तिकडे चालणाऱ्याला, आडव्या रस्त्याला जाणाऱ्याला जो दंड देतो तो वक्रतुंड. आध्यात्मिक दृष्टीने पाहिले तर आपल्या इंद्रियाचा एक गण आहे. आणि या गणाचा पती मन आहे. कोणतेही कार्य सिध्दीस न्यायचे असेल तर आपला हा गणपती ठिकाणावर असला पाहिजे. म्हणून गणपतीला प्रथम पूजण्याचा अर्थ असा की, मनाला कार्याच्या प्रारंभापूर्वी शांत व स्थिर करायचे; ज्याच्यामुळे काही विघ्ने येऊ नये व कार्य सरळपणे पार पडावे. गणेश-चतुर्थीच्या दिवशी आणलेल्या गणपतीचे विसर्जन आपण अनंत चतुर्दशी-दिवशी करतो. जे सान्त आहे त्याला अनंतात, साकाराला निराकारात व सगुणाला निर्गुणात विलीन करतो.

अकार चरण युगल । उकार उदर विशाल ।
मकार महामंडल । मस्तकाकरें ।।

'अ' कार म्हणजे गणपतीने घातलेले पद्मासन, 'उ'कार म्हणजे विशाल पोट आणआणि 'म'कार म्हणजे त्याचे मस्तक. अशी रसमय कल्पना ज्ञानेश्वर माऊलीने केलेली आहे. ध्येयमूर्ती, ज्ञानमूर्ती व मंगलमूर्ती गणेश, नेता व तत्त्ववेत्ता ह्यांचे आदर्श स्वरुप आहे.

## पान १ वरुन

### मराठा सेवक ...

भांडणे तंडे होणार नाहीत. यासाठी प्रयत्न करणे. मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी हा लढा तीव्र करण्यासाठी नेहमी जरांगे पाटलांच्या ज्या काही सूचना येतील त्याप्रमाणे समाजाचे काम करणे. निवड झालेल्या मराठा सेवकामध्ये संजय शिवाजी धुमाळ, परसराम रतन धुमाळ, सोमनाथ धुमाळ, अमर भारत धुमाळ, मोहन सुनील धुमाळ,संजय शिवाजी धुमाळ, श्रीरंग माधवराव धुमाळ, अक्षय विश्वंभर धुमाळ,आतिश मारोती धुमाळ, राजेंद्र जगन तळेकर, सुरज विष्णू धुमाळ, लखन सखाराम वरकड, वसंत कृष्णा धुमाळ, ज्ञानेश्वर राजेभाऊधुमाळ, अर्जुन केशव धुमाळ, तुषार मदन धुमाळ, सदाशिव होंडे, मनोज शाळीग्राम धुमाळ, विजय रंगनाथ धुमाळ, ज्ञानेश्वर महादेव धुमाळ, गजानन छत्रभुज धुमाळ, योगेश शंकरराव धुमाळ, सत्यवान जिजा धुमाळ,राजेभाऊ पंडित धुमाळ आदींची निवड करण्यात आली. निवडीबद्दल सर्व गावकऱ्यांच्या वतीने मराठा सेवकांचे अभिनंदन करण्यात आले.

### मुख्यमंत्री योजनादूत ...

महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. या उपक्रमासाठी आतापर्यंत १ लाख ६६ हजारांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. दि. १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना .mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. योजनादूत पोर्टलवर ज्या उमेदवारांनी नोंदणी केली आहे अशा उमेदवारांनी Apply बटन दाबून अर्ज Submit करायला विसरू नये. तरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

# पुनीत खरे; पत्रकारिता आणि जनसंपर्कातील एक प्रतिष्ठित नाव

पुनीत आर. खरे यांचा जन्म ३ सप्टेंबर १९६६ रोजी उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथे झाला. भारतीय पत्रकारिता आणि जनसंपर्क क्षेत्रातील ते एक महत्त्वाचे आणि आदरणीय व्यक्तिमत्व आहेत. ३८ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत तिने पत्रकारिता आणि जनसंपर्क क्षेत्रात आपल्या कौशल्याने आणि कठोर परिश्रमाने ठसा उमटवला आहे.

पुनीत खरे यांचे सुरुवातीचे आयुष्य अलाहाबादमध्ये गेले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत त्यांचे वडील रामेश्वर प्रसाद खरे यांचा मोलाचा वाटा आहे. पुनीतचे शालेय शिक्षण क्राइस्ट चर्च शाळेत झाले, जिथे त्याने आपल्या शैक्षणिक कारकिर्दीचा पाया घातला. त्यानंतर त्यांनी बॅचलर ऑफ कॉमर्स (इ.उे) पदवी प्राप्त केली, ज्यामुळे त्यांना व्यवसाय आणि माध्यमातील व्यावसायिक पैलू समजण्यास मदत झाली.

पुनीत खरे यांचे लग्न मनीषा पी. खरे यांच्याशी झाले असून त्यांना एक मुलगी आहे. आपल्या व्यस्त व्यावसायिक जीवनातही पुनीतने नेहमीच आपल्या कुटुंबाला प्राधान्य दिले आहे आणि वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात संतुलन राखले आहे.

पुनीत आर. खरे यांनी त्यांच्या ३८ वर्षांच्या कारकिर्दीत पत्रकारिता आणि जनसंपर्क क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांचे कौशल्य केवळ पत्रकारितेपुरते मर्यादित नाही; तो एक कुशल पीआरओ (जनसंपर्क अधिकारी), कार्यक्रम आयोजक आणि निर्माता देखील आहे. त्यांनी आयोजित केलेल्या अनेक कार्यक्रमांनी त्यांना या क्षेत्रात वेगळी ओळख दिली आहे.



*मयुरी मीडिया वर्क्स* चे मालक म्हणून पुनीत खरे यांनी त्यांचा अनुभव आणि कौशल्य नवीन उंचीवर नेले आहे. कंपनी जनसंपर्क, जाहिरात, उत्पादन, इव्हेंट व्यवस्थापन, कॉर्पोरेट शो, कलाकार व्यवस्थापन आणि शो आयोजन यासारख्या सेवांमध्ये माहिर आहे. मयुरी मीडिया वर्क्सचे उद्दिष्ट त्यांच्या ग्राहकांना सर्वोत्तम आणि तज्ञ सेवा प्रदान करणे, ज्यामुळे त्यांची ब्रँड ओळख, प्रतिमा आणि मूल्य वाढते. मयुरी मीडिया वर्क्स: यशाच्या दिशेने एक पाऊल - मयुरी मीडिया वर्क्समध्ये, पुनीत खरे यांची दृष्टी स्पष्ट आहे: दर्जेदार आणि दीर्घकालीन धोरणांद्वारे ग्राहकांपर्यंत सातत्यपूर्ण आणि लक्षित प्रेस कव्हरेज आणणे. ग्राहकांच्या गरजा ऐकणे, सखोल माहिती मिळवणे, विशिष्ट धोरणे विकसित करणे आणि त्यांची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी करणे हा कंपनीचा दृष्टीकोन आहे. पुनीत आणि त्याच्या टीमला विश्वास आहे की त्यांच्या क्लायंटची प्रतिमा आणि प्रतिष्ठा सर्वोपरि आहे आणि ते प्रत्येक प्रकल्पात अपेक्षेपेक्षा पुढे जाण्याचा प्रयत्न करतात.


कंपनीच्या सेवा भारतभर उपलब्ध आहेत, ज्यामुळे देशभरातील ग्राहकांना त्यांच्या अनुभवाचा लाभ घेता येतो. पुनीतच्या नेतृत्व क्षमतेने मयुरी मीडिया वर्क्सला केवळ यश मिळवून दिले नाही तर ती एक आदरणीय आणि नैतिक कंपनी म्हणून स्थापित केली आहे.

पुनीत आर. खरे यांचा पत्रकारिता आणि जनसंपर्काचा वारसा समर्पण, नवनिर्मिती आणि यशाचा आहे. त्यांनी केलेल्या कार्याने या क्षेत्रात उच्च दर्जा निर्माण केला आहे. मयुरी मीडिया वर्क्सच्या माध्यमातून पुनीतचे नेतृत्व आणि नवनवीन उपक्रम पुढील वर्षांमध्ये उद्योगावर प्रभाव टाकत राहील. पुनीत आर. खरे यांची कथा उत्कटता, समर्पण आणि उत्कृष्टतेची बांधिलकी आहे. पत्रकारिता आणि जनसंपर्क क्षेत्रातील त्यांच्या ३८ वर्षांच्या योगदानामुळे त्यांना या क्षेत्रात एक वेगळे स्थान प्राप्त झाले आहे. मयुरी मीडिया वर्क्सच्या माध्यमातून तो सतत नेतृत्व करत असून नवनवीन शोध घेत असल्याने त्याचा प्रभाव पुढील अनेक वर्षांपर्यंत जाणवेल.

# राष्ट्रीय हिंदी विद्यालयाची विद्यार्थिनी श्रेया वाजे हिचे यश

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील राष्ट्रीय हिंदी विद्यालयाच्या वर्ग आठवीमध्ये शिकणारी विद्यार्थिनी श्रेया पांडूरंग वाजे हिने गणपती नेत्रालय,जालना मार्फत आयोजित जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेमध्ये इयत्ता आठवी ते दहावीच्या गटातून जालना जिल्ह्यातून सर्वप्रथम क्रमांक पटकावला आहे. गणपती नेत्रालयामार्फत आयोजित बक्षीस वितरण समारंभात तिचे मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र,ट्रॉफी देऊन पालकांसह सन्मानित करण्यात आले. या यशाबद्दल तिचे शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर,समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ उपाध्यक्ष प्रा.राम कदम,सचिव बिजू वाघमारे, संचालक रामचंद्र चौधरी, हरिहर शिंदे, नंदकुमार जाधव, शोभाताई अंबेकर, अश्विन अंबेकर, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गाढवे, प्रा.डॉ.सुहास सदाव्रते, आर. आर. जोशी, राजेभाऊ मगर, राष्ट्रीय हिंदी विद्यालयाचे मुख्याध्यापक मनीष अग्रवाल, उपमुख्याध्यापक गिरीश दशरथ, श्रेयाचे वर्गशिक्षक नागोरी, कलाशिक्षक ठोंबरे, जेथलिया, गाडेकर यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक, गायत्री नगर मधील रहिवाशी आदींनी अभिनंदन व कौतुक केले आहे.







## गौराईचे आगमन...

**उदो...उदो अंबाबाईचा... गौराईचे उत्साहात आगमन झाल्यानंतर जुना जालन्यातील महेश जोशी यांच्या घरी गौराईची आरस करत सारिका म हेश जोशी यांनी रांगोळीव्दारे हुबेहुब कोल्हापुरची महालक्ष्मी अंबाबाईची मनमोहक मुर्ती साकारली होती. ही सर्वांचेच लक्ष वेधून घेत होती.**

# कॅरेम स्पर्धेसाठी जेबीके महाविद्यालयातील सात खेळाडुंची विभागावर निवड

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत श्रीमती जे. बी. के. व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयातील सात विद्यार्थीची निवड विभाग स्तरावर झालेली आहे त्यामध्ये वयोगट १४ वर्षातील मुलीमध्ये अनुष्का कामे, वयोगट १७ वर्षातील मुलींमध्ये धनश्री शेळके, भक्ती साळवे, ज्ञानेश्वरी साळवे, वयोगट १९ वर्षातील मुलांमध्ये श्लोक देशमुख, यश शेवाळे, मुलीमध्ये श्रद्धा कासारे यांची निवड झालेली आहे

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद जालना यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जालना जिल्हा कॅरम संघटना व गोदावरी म ाध्यमिक विद्यालय गुरु पिंपरी तालुका घनसावंगी यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित जिल्हास्तरीय कॅरम क्रीडा स्पर्धा.२०२४-२५. गोदावरी माध्यमिक विद्यालय गुरु पिंपरी तालुका घनसावंगी जिल्हा जालना येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धे त सात खेळाडूंची निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजय काबरा, उपाध्यक्ष शेख जमीर सर, सचिव सत्यनारायण सोनी, कोषाध्यक्ष सुभाष राठी, ज्येष्ठ संचालक रामनारायण काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी अध्यक्ष सुरेश शेठ काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी सचिव प्रेमसुख काबरा, माजी सचिव प्रल्हाद टेंभुर्णीकर, संचालक राजीव काबरा, संचालक दीपक काबरा, ज्येष्ठ संचालक निकम सर , , , संचालक विश्वनाथ सांगुळे, संचालक प्राध्यापक तथा उपप्राचार्य दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णी कर , संचालक प्रदीप मुळे, संचालक प्रदीप काबरा, प्राचार्य तथा मुख्याध्यापक नंदकुम ार काळे, उपमुख्याध्यापक पंजाबराव सोळंके, पर्यवेक्षक धनंजय पुराणे, क्रीडा प्रमुख के.आर. भुतेकर , सखाराम बोरकर, रमेश इंगळे, विष्णू जाधव,गणेश सावसक्के, सम ाधान कांबळे, दत्ता उखर्डे, क्रीडाशिक्षक,राजेश शेवाळे, भिवसन ससाणे, प्रा. सुनील बनसोडे, प्रा. रामदास भांगे, प्रा. कैलास जाधव गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव,, रवींद्र म ोरे, संजय कुलकर्णी, संजु कुलकर्णी, राजेंद्र जगताप, , दिनकर उखर्डे, , प्रा . अरुण आहेर, राजू डोमळे, आवटी मॅडम, पाटील मॅडम, भिलावेकर मॅडम, जाधव मॅडम, शेख मॅडम, लंबे मॅडम, नागोराव देशमुख, दगडूबा तांबेकर, दीपक देशमुख खेळाडूचे अभिनंदन केले.



# हृदयरोगाच्या जनजागृतीसाठी परतूरात तीन मिनिट आयुष्याचे उप्रक्रम - डॉ.नंद



**परतूर । प्रतिनिधी -** दिवसेंदिवस हृदयासंबंधी विकार असलेले रुग्ण वाढत असून, यात आता वयाची अट राहिली नाही. त्यामुळे प्रत्येकाने प्राथमिक अवस्थेतच काळजी घेणे आवश्यक आहे. असे मत डॉ. दत्तात्रय नंद यांनी व्यक्त केले.

परतूर शहरातील रामेश्वर गणेश मंडळाच्या वतीने विविध सामाजिक सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आरोग्यावर आधारित तीन मिनिट आयुष्याचे या उपक्रमांतर्गत डॉ.दत्तात्रय नंद व डॉ.भानुदास कदम यांनी अचानक हृदय बंद पडून रुग्ण बेशुद्ध पडल्यावर रुग्णालयात जाईपर्यंत सीपीआर देऊन विशिष्ट पद्धतीने छाती दाबून व तोंडाद्वारे श्वास देऊन रुग्णाला वाचवू शकतो. याबद्दल प्रात्यक्षिक करून दाखवले. रामेश्वर गणेश मंडळाच्या वतीने बेसिक लाइफ सपोर्ट कार्यक्रम घेण्यात आला. डॉ. दत्तात्रय नंद व डॉ. कदम यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बोलतांना डॉ.नंद म्हणाले की ग्रामीण भागात हृदयसंबंधी रोगावर उपाययोजना बाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. तसेच यावेळी रमाकांत बरिदे यांना आधारस्तंभ पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

# वडोद तांगडा येथील जिल्हा परिषदेची शाळा तालुकास्तरावर प्रथम

## मुख्यमंत्री सुंदर शाळा माझी शाळा उपक्रम



**भोकरदन । प्रतिनिधी -** तालुक्यातील वडोत तांगडा येथील जिल्हा परिषद शाळा प्रथम सविस्तर वृत्त असे की गेले आठ दिवस मुख्यमंत्री सुंदर शाळा ,माझी शाळा या उपक्रमांतर्गत संपूर्ण महाराष्ट्रभर जिल्हा परिषद तसेच खाजगी शाळांनी आपली नोंदणी करून त्याच्या पुनर्मुल्यांकनासाठी केंद्र स्तर, तालुकास्तर ,जिल्हास्तर असे मूल्यांकन करण्यात आले या मूल्यांकनात जि.प.कें.उ.प्रा.शा.वडोद तांगडा ही शाळा प्रथमतः केंद्र स्तरातून प्रथम येऊन तिचे म ूल्यांकन तालुकास्तरीय समिती द्वारा करण्यात आले. यामध्ये शालेय परिसर ,विद्यार्थी गुणवत्ता, भौतिक सुविधा अशा सर्व स्तरावरून जेव्हा तालुकास्तरीय समितीने मूल्यांकन केले त्या मूल्यांकनाद्वारे सदरील शाळेला तालुका स्तरातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा वडोद तांगडा या शाळेचा परिसर ,भौतिक सुविधा व विद्यार्थी गुणवत्ता ही खरोखर अतिशय दर्जेदार व उत्तम प्रकारची आहे या शाळेचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मुख्याध्यापक जे वाय सय्यद व त्यांचे सर्व सहकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोहर पवार ,उपाध्यक्ष विजय सपकाळ व सर्व सदस्य तसेच ग्राम पंचायत सरपंच सौ मनीषा वास्कर, उपसरपंच नाना तांगडे सदस्य नारायण तांगडे तसेच सर्व सदस्य,संपूर्ण गावकरी, पालक वर्ग ,विद्यार्थी यांनी अहोरात्र मेहनत घेऊन शिक्षणप्रेमी संपूर्ण गावचे मार्गदर्शक डॉ सी आर तांदूळजे वर्धमान वास्कर, माजी सरपंच रामधन मुऱ्हाडे रामेश्वर भवर व सर्व शिक्षण प्रेमी नागरीक तसेच गावातील सर्व मित्र मंडळ, ॲडव्होकेट , यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेसाठी अनेक प्रयत्न करत, मदत देत शाळेची गेल्या पाच वर्षापासून शाळेचा सर्वांगीण विकासाचा ध्यास मनात घेऊन ही शाळा आदर्श बनवली आहे .पंचक्रोशीतील शाळा , शालेय व्यवस्थापन समित्या शालेय परिसर, विद्यार्थी गुणवत्ता तसेच भौतिक सुविधांचा आढावा घेण्यासाठी व या शाळेतील उपक्रम आपल्या शाळांमध्ये राबवण्यासाठी या शाळेला वारंवार भेटी देत असतात. या शाळेला प्रशस्त प्रांगण असुन त्यामध्ये अमृतवाटीका, ऑक्सिजन पार्क, परसबाग, व्यायाम शाळा, प्रशस्त अशी विज्ञान प्रयोगशाळा,कॉम्पूटर लॅब ,वाचनालय, विद्यार्थी बचत बँक, ३५÷३५ आकाराचे भव्य रंगमंच व इङ प्रकल्पांतर्गत ( Building s a Learning ids) सम्पूर्ण शालेय इमारत स्वतः शिक्षकांनी कोरोना काळात आतून बाहेरून रंगवली आहे हे विशेष . सर्वांच्या सहा कार्याने व मेहनतीचे फळ म्हणून मागील वर्षीही या शाळेचा याच स्पर्धेत तालूक्यातून दुसरा क्रम ांक प्राप्त केला होता . या शाळेला पाहून आपोआपच मनात गीत गुणगुणते ही आवडते मज मनापासून शाळा, लाविते लळा जसा माऊली बाळातालुका स्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त झाल्यानंतर दिनांक १३/९/२०२४ रोजी जिल्हा स्तरीय समितीनेही शाळेची पाहणी व मुल्यांकन केले आहे. जिल्हा स्तरावर शाळेला पहिला क्रमांक मिळावा अशी ही शाळा असल्याची प्रतिक्रीया गावकऱ्यांमधून उमटत आहेत.

# १५ वर्षापासून प्रलंबित असलेल्या शेतरस्त्याची 'समृद्धी'कडुन दुरुस्ती

**जालना । प्रतिनिधी -** गेल्या पंधरा वर्षापासून शेकडो शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असलेला अंबड तालुक्यातील धाकलगाव ते नावडे वस्ती व घनसावंगी तालुक्यातील हरसिंग नाईक तांडा ते राणी उंचेगाव हा शेत रस्ता नादुरुस्त होता. वारंवार हे रस्ते दुरुस्त करण्याची मागणी शेतकरी करत होते. परंतु त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. पाच वेळा स्थानिक आमदाराने या रस्त्यावर नारळ फोडले पण काम काही केले अन्ही. शेवटी समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी स्वखर्चातून हे दोन्ही रस्ते शुक्रवारी तयार करायला सुरुवात केली. यामुळे दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी सतीश घाटगे यांचे आभार मानले.

घनसावंगी तालुक्यातील हरसिंग नाईक तांडा ते राणी उंचेगाव हा रस्ता नादुरुस्त असल्याने येथील शाळकरी म ुलांना शाळेत जाता येत नव्हते. तसेच शेतकऱ्यांना शेतात जाणे जिकरीचे बनले होते. अशीच स्थिती धाकलगाव ते नावडे वस्ती या रस्त्यामुळे दाखल गाव येथील शेतकऱ्यांची होती या दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी सतीश घाडगे यांची भेट घेऊन हे रस्ते दुरुस्त करून देण्याची मागणी दोन दिवसापूर्वी केली होती. या म ागणीची तात्काळ दखल घेऊन सतीश घाटगे यांनी या दोन्ही रस्त्याचे काम स्वखर्चातून सुरू केले अगोदर काम सुरू करून नंतर या रस्त्याचे उद्घाटन त्यांनी केले. यावेळी दोन्ही गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक वर्षापासूनची मागणी दोन दिवसात पूर्ण केल्यामुळे सर्व शेतकरी आनंदी झाले. त्यांनी सतीश घाटगे यांचे आभार मानले.



# आरएसआय पदाच्या पदोन्नतीसाठी परीक्षेस बसण्याचा मार्ग मोकळा; मॅटचे आदेश

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** महाराष्ट्र पोलीस महासंचालकांमार्फत राखीव पोलीस उप निरीक्षक (आरएसआय) पदाच्या पदोन्नतीसाठीची विभागीय अर्हता परिक्षा २०२४-२०२७ दिनांक २०/०७/२०२४ रोजी आयोजीत करण्यात आली आहे. सदरच्या परीक्षेसाठी संबंधित विभागाकडुन परीक्षेसाठीची पुर्तता करणाऱ्या अनेक कर्मचा-यांना अपात्र घोषीत करण्यात आल होते. जालना येथील काही कर्मचाऱ्यांनी ॲड. विष्णु यादवराव पाटील यांच्यामार्फत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण (मॅट) येथे मुळ अर्ज दाखल केले होते. सुनावणीअंती मा. न्यायाधीकरणाने अर्जदारांमार्फत करण्यात आलेला युक्तीवाद ग्राह्य धरून दिनांक २०/०७/२०२४ रोजी होणा-या विभागीय लेखी परीक्षेसाठी अर्जदारांना पात्र घोषीत करून त्यांना परीक्षेस बसु देण्याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक यांना आदेश पारीत केले आहेत. सदरच्या आदेशान्वये मुळ अर्जदारांचा विभागीय परीक्षेस बसण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मुळ अर्जदारांच्या वतीन ॲड. विष्णु यादवराव पाटील यांनी काम पाहिले व ॲड. आर. एम. रासवे यांनी त्यांना सहकार्य केले.

# टेंभुर्णी येथील सर्वात जुने गणेश मंडळ सरस्वती गणेश मंडळच्यावतीने विविध कार्यक्रम



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील ५८ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या सरस्वती गणेश मंडळ, विविध कार्यक्रमाने आपला उत्सव साजरा करत आहेत. पारंपारिक भजनी मंडळ पासून सुरुवात होणाऱ्या व्याख्यानापासून सुरुवात होणाऱ्या, पूजा आरच्या आणि भाविक भक्तांना प्रसादाचे वाटप करून विविध कार्यक्रमानिमित्त साजरा करत असतात. टेंभुर्णी ते सर्वात जुने गणेश मंडळ असून ५८वर्षात पदार्पण केलेले आहे. विविध म ान्यवर या गणपती मंडळाचे सदस्य राहून गेलेले आहे. या गणपती मंडळाचे यावर्षीचे अध्यक्ष आहेत सागर उखर्डे, उपाध्यक्ष रमेश उखर्डे, सचिव ज्ञानेश्वर सपकाळ, बाळू खर्डे रूक्मण सुरडकर, रामू उखर्डे, देशम ुख सर, गणेश धनवाई, सांडू उखर्डे, बाळकृष्ण धनवई सर, स्वप्निल सपकाळ, भगवान उखार्डे गणेश सपकाळ, गजू उखार्डे, नथू खर्डे, सुरेश उखर्डे, शंकर उखर्डे भिकन उखार्डे, दीपक उखार्डे, संतोष भागवत राजेश धनवई, सुनील उखर्डे ज्ञानेश्वर उखर्डे, दीपक उखर्डे राहुल उखर्डे, रामू खर्डे आकाश उखर्डे, ज्ञानेश्वर उखर्डे, दीपक उखर्डे, राहुल उखर्डे रामू खर्डे, उखर्डे विजय, आकाश धनवाई रोहन उखर्डे, संतोष सपकाळ,प्रकाश उखर्डे ठकसेन उकर्डे, लक्ष्मण उखर्डे अजय आल्हाट, कृष्णा वाघ बाळू सुरडकर राहुल धनवाई, संतोष धनवई, विजय काठोळे, आधी सदस्य काम करतात. येत्या रविवारी सरस्वती गणेश मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. अध्यात्मिक, सामाजिक उपक्रम राबवण्यात सरस्वती गणेश मंडळ आणि पुढाकार घेतलेला आहे.



नवीन जालन्यातील फुल बाजार येथील श्री विघ्नहर्ता गणेश मंडळाने प्रतिष्ठापित केलेली अयोध्येतील श्री रामाच्या सावळ्या रूपातील गणेश मूर्ती भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे.

# आनंदी जीवन जगण्यासाठी पैश्यापेक्षा चांगल्या विचारांची गरज - भास्कर अंबेकर

**जालना । प्रतिनिधी** - आनंदी जीवन जगण्यासाठी पैश्यापेक्षा चांगल्या विचारांची गरज असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केले.

जालना येथील तेली पंचायत वाडा,मोदीखाना येथे रोटरी डिस्ट्रीक्ट जालना व जमनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल स्ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मधुमेह तपासणी व मार्गदर्शन शिबीराच्या उद्घाटनाप्रसंगी जिल्हाप्रमुख अंबेकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मार्गदर्शक डॉ. राजेश सेठीया, प्रमुख पाहुणे गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर,गणेश फेस्टीव्हलचे अध्यक्ष राजेंद्र गोरे, उपजिल्हाप्रमुख रावसाहेब राऊत, डॉ. सुरेश साबू, नितीन खंडेलवाल, डॉ. सुरज सेठीया, पन्नलाल बगडिया, विष्णु वाघमारे, महादु देशमाने,नंदु खर्डेकर, शिवा श्रीमाली, कुंडलकर, शहरप्रमुख घनश्याम खाकीवाले, शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले, संदीप नाईकवाडे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलतांना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, आधुनिक काळात माणसाची जीवनशैली पुर्णपणे बदलून गेली आहे. मोबाईलशिवाय जगणे अवघड झाले असून एका-एका घरात पाच-पाच मोबाईल दिसून येत आहे. मोटार सायकली, चारचाकी वाहने यामुळे आज कोणी जराही पायी चालण्यास तयार नाही. माणसाचे जीवन आज सर्वस्वी यंत्रावर अवंलबून झाल्याने आरोग्य धोक्यात आल्याचे अंबेकर म्हणाले. आज अनेक गोष्टींवर अनावश्यक खर्च वाढला आहे. उत्पन्न व खर्चाचा तळमेळ बिघडल्याने घरा-घरांत तणावाची परिस्थिती आढळून येते. त्यामुळे कुंटूंबात अनेकांना शुगर, बीपी, रक्तदाब, हृदयरोग असे आजार जडत आहेत. अगदी ३० ते ३५ वयोगटातही असे गंभीर आजार आढळून येत आहेत हे सर्व टाळायचे असेल तर आज सर्वांनीच आपली जीवनशैली बदलणे गरजेचे आहे. सर्वत्र आज एकमेकांत व्देष भावना वाढतांना दिसून येते. एकमेकांतील सद्भाव नाहीसा झाला असून नाकारात्मक भावना मोठ्या प्रमाणावर दिसून येते. त्यामुळे माणुस पैसे असूनही आरोग्याने मात्र दुबळा झाला असल्याचे दिसून येते. आरोग्य हीच खरी संपत्ती असल्याने त्यावर लक्ष देवून शरीर सदृढ ठेवणे गरजेचे असल्याचे अंबेकर म्हणाले. यावेळी कार्यक्रमाचे मार्गदर्शक डॉ. राजेश सेठीया यांनीही उपस्थित नागरिकांना आरोग्य विषयी सविस्तर मार्गदर्शन करुन आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केले. यावेळी मोदीखाना परिसरातील अनेक नागरिकांनी मधुमेह तपासणी करुन घेतली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवसेनेचे शहरप्रमुख तथा आयोजक बाला परदेशी यांनी केले. शिबीर यशस्वीतेसाठी गणेश लाहोटी, रमेश तुंगेवार, इम्तीयाज शेख, दुर्गा शंकरपांडे, गणेश नवपुते, गौरव कौशल्ये, सुनिल वाढेकर,राम देशमाने, दर्शन चौधरी, पांडूरंग अप्पा, दत्ता नवपुते, मनोज मालानी, विशाल सुरा आदींनी परिश्रम घेतले.



## जिल्हा क्रीडा संकुलाच्या कामास जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांची भेट

**जालना -** जालना येथील जिल्हा क्रीडा संकुलावर विकसित करण्यात येत असलेल्या विविध क्रीडा संकुलाच्या कामांना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी अचानक भेट देत पाहणी केली. कामांच्या पाहणी दरम्यान कंत्राटदार, वास्तुविशारद तसेच संबंधित अधिकाऱ्यांना प्रगतीवर असलेली व अंतिम टप्प्यातील कामे दर्जेदारपणे करण्याच्या सुचना दिल्या. जिल्हा क्रीडा संकुलावर टप्पा क्र.१ अंतर्गत टेनिस कोर्ट २, सिंथेटीक बास्केटबॉल १, आर्टिफिशियल क्रिकेट टर्फ १, सिंथेटीक स्केटींग रिंग १, व्हॉलीबॉल मैदान २, कबड्डी मैदान २, खोखो मैदान २, जिम हॉल १, संरक्षक भिंत तसेच अंतर्गत रस्ते व ड्रेनेज लाईन आदि कामे जिल्हा क्रीडा संकुल समितीकडून विकसित करण्यात येत आहेत. टप्पा २ अंतर्गत ४०० मिटर सिंथेटीक ट्रॅक व नॅचरल फुटबॉल मैदानाचे काम सुरु करण्यात आले आहे. या कामाची प्रत्यक्ष पाहणीही जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी केली. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, कंत्राटदार, आरती चिल्लारे, सिध्दार्थ कदम, आशिष जोगदंड, संतोष वाबळे यांची उपस्थिती होती.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.